ISSN-2320-4439
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

VOLUME : III ISSUE III Oct.- Dec.2019



ART'S I COMMERCE I SCIENCE I SOCIAL SCIENCE I
EDUCATION I MANAGEMENT I MEDICAL I ENGINEERING & IT I
LAW I PHARMACY I PHYSICAL EDUCATION I AGRICULTURE I
JOURNALISM I MUSIC I LIBRARY SCIENCE I

Editor
Dr. Sadashiv H. Sarkate
E-mail : powerofknowledge3@gmail.com
www.powerofknowledge.co.in

# अनुक्रमणिका (Index)


| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| 1 | Sanskrit : A Scientific Language | Dr.Sanjivani Shripad Nerkar | 7-9 |
| 2 | AN EMPIRICAL STUDY OF AGRICULTURAL LABOUR IN INDIA | Dr.Khande Sominath Sarandhar | 10-13 |
| 3 | Causes of Climate Change in Globalized World | Dr.Jitendra Ghodke | 14-17 |
| 4 | Assessment of the Problem of Building Basement Water : A case study of shirur town, in Pune district, Maharashtra. | Dr.Atul M.Jethe | 18-22 |
| 5 | "Effect of wave dynamics on the morphology of sandy beaches at village Borya & Kondkarul (South Facing) In Guhagar Taluka, Ratnagiri District, Maharashtra." | Prof.Ankush Manaji Pawar | 23-30 |
| 6 | Globalization and its impact on Literacy rates in India. | Mr.Usar Bharat Rupchand | 31-34 |
| 7 | Darwin's Theory of Evolution | Dr.Achole P.B. | 35-41 |
| 8 | Natural vegetation and Ecosystems | Dr.More Vijaykumar V. | 42-49 |
| 9 | SURVEY OF FDI IN INDIA | Dr.Madrewar S.G. | 50-53 |
| 10 | Tourism an Invisible Trade - Indian context. | Dr.Vishwas B. Chavan | 54-59 |
| 11 | Self-Help Group (SHC) - a tool for alleviation of urban poverty and women empowerment. | Prof.Girish J. Mahaddalkar | 60-65 |
| 12 | Digital villages, Digital Banking and cashless economy, need to reduce costs and increase efficiency improving digital maturity. | Prof.Dr.Mrs.Patil Sujata Chandrakant | 66-70 |
| 13 | Security Measures for Libraries. | Dr.Kumbhar Kalyan N. | 71-77 |
| 14 | Computer Bases Training Techniques Sports | Dr.Mrs.Nazma Abdulgani Khan | 78-80 |
| 15 | Advantage of Computer Based Volley ball Training For Giving Feedback. | Dr.Shaikh Shafioddin Sharfoddin | 81-83 |
| 16 | Five Laws of Library Science | Prof.Hangargekar Vithal Nivratirao | 84-86 |
| 17 | Determination of photon attenuation parameters of smart materials. | Sandip S. Pawar, Siddhewar D. Raut, Pravin P. Pawar, Vishal V.Awasarmal | 87-93 |
| 18 | Rural Market Centre in Wai Tahsil : A Geographical Analysis | Dr.Rathod S. B. | 94-100 |
| 19 | रामण्णा' जीवनरहस्याच्या शोधासाठी निघालेला वीरनायक | डॉ.एम.ए.कव्हळे | 101-104 |
| 20 | अण्णा भाऊंच्या प्रातिनिधिक कथा | भास्कर बंडू ससाने | 105-108 |
| 21 | दलित कथा आणि सद्य:स्थिती | डॉ.अर्चना काटकर - सोनवणे | 109-112 |

# 'रामण्णा' जीवनरहस्याच्या शोधासाठी निघालेला वीरनायक

**डॉ.एम.ए.कव्हळे**
साहाय्यक प्राध्यापक,मराठी विभाग
सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव

जी. ए. कुलकर्णी यांची 'काजळमाया' कथासंग्रहातील 'ठिपका' ही कथा रामण्णा नावाच्या धनगराची कथा आहे. गिरणीच्या आगमनाने आणि वर्ष कोरडे गेल्याने सर्व धनगर निघून गेल्यानंतर शेवटी मुलगा राचय्या आणि सून भवरी यांच्या जाण्याने निराश आणि काहिसा मोकळा झालेला म्हातारा रामण्णा एका ठिपक्याच्या जिज्ञासेतून प्रवास करतो. या प्रवासाचीच कथा म्हणजे 'ठिपका' होय. ज्या भूभागावर या कथेचा प्रारंभ होतो. त्याठिकाणी रामण्णाच्या वडीलाची माती पडली होती. रामण्णा याच भूमीवर वाढला, मोठा झाला. नंतर याचठिकाणी अनेक धनगरांनी आपली घरे वसविली; पण गिरणीच्या आगमनाने इथला परिसर ओसाड झाला. सर्व धनगर पोटासाठी स्थल सोडून निघून गेली. आज शेवटी राचय्या आणि भवरीने जाण्याचा निर्णय घेतला. राजय्याने रामण्णाला सोबत घेण्याचा मोठा आग्रह केला पण रामण्णा तयार झाला नाही. याच मातीमध्ये आपल्या जीवनाची माती व्हावी या भावनेने त्याने नकार दिला आहे. येथे रामण्णाचे भूमीविषयक प्रेम महत्त्वाचे आहे. मानवी जीवनाचे सार्थक झाले अशा मातीविषयी मानवी मनामध्ये एक आदर आहे. त्यामुळे भूमी ही त्याच्या लेखी मानवाचे पालनपोषण करणारी माता आहे. त्यामुळे रामण्णाच्या मनातील भूमीविषयीचे प्रेम, ओढ आदिम पातळीवरची दिसते. काही आदिवासी जमाती आजही भूमीवर नांगर चालवत नाहीत या पाठीमागेही मातीविषयक हीच भावना आहे. सीतेचा जन्म आणि मृत्यू याच भूमीतून झाल्याचे स्पष्ट आहे. त्यामुळे रामण्णाच्या भूमीविषयक प्रेमातून मातेच्या आदिबंधाचे आविष्करण कथेमध्ये झालेले दिसते.

मानवी जीवनाच्या प्रवाहामध्ये यंत्रयुगाचे आगमन झाल्याने मानवी जीवन उद्‌ध्वस्त झाल्याचेही सूचन कथाकार करताना दिसतो. गिरणीच्या आगमनाने परिसरात मेंढ्यांसाठी गवत राहिले नाही. त्यामुळेच धनगराची वस्ती उद्‌ध्वस्त झाली आहे. यंत्रयुग भावनिक जग उधळून टाकते आणि शेवटी माणूस रामण्णासारखाच एकटा राहतो. रामण्णा असाच एकटा राहिला आहे. जीवनाच्या सर्व इच्छा संपल्या आहेत, कोणतीही आशा शिल्लक नसल्याने या मातीमध्ये आपले खत व्हावे अशी त्याची शेवटची इच्छा आहे. म्हणूनच भवरीने ठेवलेली कांबळी आणि राचय्याने ठेवलेल्या वाहाणा त्याने न स्वीकारता तशाच पेटीमध्ये ठेवल्या आहेत. कधीतरी मूले परत आलीच तर त्यांच्यासाठी हे सर्व पेटीत ठेवले आहे. त्याचबरोबर राचय्याला शेवटी द्यावयाचे गळयातील वाघनखही त्याने पेटीत ठेवले आहे. या सर्व कृतींमधून रामण्णाच्या जीवनातील सर्व इच्छा आकांक्षाचा शेवट झाल्याचे सूचित होते. असा रामण्णा धनगर अंगणात लिंबाच्या झाडाखाली अंग आवळून, गुडघे उंचावून बसला आहे. त्यावेळी त्याला समोरच्या टेकडीवर उंच ठिकाणी पांढरा ठिपका

दिसला आहे. रामण्णाने या ठिपक्याकडे टक लावून पाहताच तो विशेष उठावदार दिसू लागला. या ठिपक्याविषयी त्याच्या मनात उत्सूकता वाटू लागली, अनेक वर्ष या परिसरामध्ये राहूनही हा ठिपका त्याला कधीच दिसलेला नाही. आज आयुष्यातील सर्व गोष्टी संपल्यावर आणि शरीरातील त्राणही संपल्यावर तो रामण्णाला दिसतो. हा ठिपका म्हणजे काय या जिज्ञासेपोटी रामण्णा धनगर त्यादिशेने प्रवास सुरु करतो.

रामण्णाला दिसलेला हा ठिपका संज्ञाकंदाचे प्रतीक आहे. या जीवनरहस्याचा शोध घेण्यासाठी रामण्णाचा हा प्रवास सुरु झाला आहे. रामण्णाच्या या प्रवासामधून प्रवासाचा आदिबंध आविष्कृत झाला आहे. रामण्णाचा हा प्रवास जीवनाच्या अंताकडचा प्रवास असून जीवनरहस्याच्या शोधासाठीचा हा प्रवास आहे. या प्रवासाला जाण्यासाठी सर्व इच्छा, आकांक्षा, जीवनातील लालसा मरावी लागते. रामण्णा धनगर या सर्वांतून मुक्त होऊन ठिपक्याच्या दिशेने प्रवास करत आहे. त्यामुळे त्याचा प्रवास त्याने आंरभला आहे. या प्रवासामध्ये त्याला सर्वप्रथम गारूडी भेटतो. हा गारूडी सर्वसामान्य माणसाचा प्रतिनिधी आहे. त्याने गारुड्याचा व्यवसाय केला, नंतर तो डबा सिनेमावाला झाला आहे. मानवी जीवनाची जगण्याची धडपड गारुड्याच्या द्वारे चित्रित होते. या गारुड्याला सोन्याचा साप पकडायचा आहे. त्यासाठी त्याची ही भटकंती आहे. या नागाला पकडून खेळवायचं नाहीतर आपण याठिकाणी खत टाकायचं या उद्देशाने तो जीवन जगतो आहे. सामान्य माणसातील लोभीपणा, लालसा गारुड्याच्यामध्ये आहे. त्यामुळे तो सामान्य माणूसच आहे. तो व्यसनी असण्यातूनही तो सामान्य माणसाचे प्रतिनिधीत्व करत असल्याची कल्पना येते.

रामण्णाने मात्र जीवनात कधी व्यसन स्वीकारलेले नाही. गारुड्याने त्याला दिलेला सल्ला त्यामुळेच त्याला पटत नाही आणि त्याचा पुढील प्रवास सुरु होतो. यानंतर त्याला प्रवासामध्ये एक संन्याशी भेटतो. हा संन्याशी झोपडीमध्ये राहणारा आहे. त्याच्याजवळ माणसाच्या कवटीचा कमंडलू आहे. हा संन्याशी ज्ञानी पुरुष आहे. रामण्णाने त्याला देवळाकडे जाण्याचा इरादा सांगताच तो म्हणतो, “अरे, जे दिसतं तेवढ्यानं माणसानं फसून जाऊ नये. तो सगळा वरवरचा नखरा, समोर घातलेला रेशमी पडदा असतो. हा पडदा फाडायला मन दगडाचं करावं लागतं. खरं काय हे शोधायला आणि त्याकडे धैर्याने पाहायला डोळे गारगोटीचे करावे लागतात. पण आपण हे सगळं निष्ठुरपणे केलंच पाहिजे. नाहीतर आपण माणसं रे कसली? येथे पाण्यासारखं काही दिसतं म्हणून त्यात तोंड घालून मरावं ते जनावरांनी, पाखरांनी! माणसानं तसं मरायचं म्हणजे काय? सत्य काय आहे हे शोधत नारळाच्या झाडावर वरतीवरती जावं. तेवढी जर हिंमत नसेल, पायात नेट नसेल, तर निदान मुळात तरी खोलखोल खणत जावं.”[१] हा संन्याशी कवट्या जमा करतो. त्याचा इंद्रियनिष्ठ ज्ञानावर विश्वास नाही आणि श्रद्धेवर श्रद्धाही नाही. त्याला भौतीक सुखाची लालसा नसून त्याचा मानवी कवट्यांवर विश्वास आहे. कवटी हे मृत्यूचे प्रतीक असल्याने मृत्यू हाच अंतिम वास्तव असल्याचे त्याचे मत आहे. त्यामुळेच तो ज्ञानी आहे. पांढऱ्या ठिपक्याच्या प्रवासाला तो जाणे शक्य नाही. या संन्याशापासून रामण्णा पळून जातो. त्याचे तत्वज्ञान आणि मृत्यूविषयक ज्ञान तो पचवू शकत नाही. तो पळून एका दगडावर

बसतो, त्याठिकाणी त्याला भुत्या भेटतो. हा भुत्या आंधळा आहे. हा भुत्या अंगरखा आणि कवड्यामुळे भगताच्या वेशात वाटत असला तरी तो भाविक माणसाचा प्रतिनिधी आहे. टेकडीवरील जगदंबेच्या देवळातील भुत्या असल्याचे तो स्वतःच सांगतो. जगदंबेचे मंदिर त्याचे असल्याचा तो दावा करतो. एका दृष्टीने हा भुत्याही सर्वसामान्य माणूसच आहे.

यानंतर रामण्णाला भेटणारा शेवटचा व्यक्ती म्हणजे अपंग मुलगा आहे. या अपंग मुलाला जगण्याची आस आहे. खाली टेकडीच्या पायथ्याशी राहणारा संन्याशी त्याच्या मृत्यूची अपेक्षा करतो. भुत्या मात्र त्याला जेवायला घालून गेला आहे. या अपंग मुलाला देवळाकडे जायचे आहे. रामण्णाला तो देवळाकडे नेण्याची विनंती करतो; पण रामण्णा त्याला नकार देतो. रामण्णाचे शरीर या पांगळ्या मुलाला उचलून नेण्याइतके सक्षम नसल्याची त्याला जाणीव आहे. या मुलाच्या वडिलांनी त्याला अनेक वर्षापूर्वी याठिकाणी सोडून दिले आहे. हा मुलगा मानवाच्या अस्तित्वाचे प्रतीक वाटतो. त्याला रहस्याचं आकलन नाही. देवळापर्यंत पोहोचण्याची इच्छा असूनही तेथे पोहोचता येणे शक्य नाही. शेवटी फक्त मृत्यूची वाट पाहत राहणेच त्याच्या हातात आहे. मानवजातीच्या अस्तित्वाचे खरे वास्तव हेच असावे.

मुलाला परत येण्याचे आश्वासन देऊन रामण्णा टेकडी चढू लागला. टेकडीवर गेल्यानंतर त्याला अतिविशाल, दैदीप्यमान, उत्तुंग मंदिर दिसले. या मंदिराच्या पायऱ्यावरून तो चढू लागला तर हे मंदिर त्याला फिरताना दिसले. त्याचे सर्वच खांब गोल फिरत होते. रामण्णा दरवाजाच्या जवळ आला पण ज्या दरवाजाजवळ तो उभा असे तो नेमका बंद होता. रामण्णाने सर्व शक्ती एकवटून दरवाज्यामध्ये पहिल्यानंतर त्याचा चेहरा सूर्यास्तासारखा झाला, अपंग मुलाला खाली वाकून काहीतरी सांगण्याचा प्रयत्न केला पण त्याचवेळी त्याच्या हाताचा आधार सुटताच फिरत्या मंदिराने त्याला जवळच्या शिळया साचलेल्या पाण्याच्या अर्धवट भरलेल्या तीर्थकुंडामध्ये फेकून दिले. याठिकाणीच त्याचा अंत झाला.

शेवटचा रामण्णाचा प्रवास हा मंदिराजवळील आहे. मंदिर हे मातेच्या आदिबंधाचे प्रतीक आहे. रामण्णा जीवनरहस्यापर्यंत पोहोचला, त्याला जीवनरहस्यही कळाले पण या जीवनरहस्याचा शोधाबरोबरच त्याचा अंतही अटळ असतो, त्यामुळे त्याचा अंत झाला. जीवनाच्या शेवटी मुलाने विसाव्यासाठी आईकडे यावे त्याप्रमाणे रामण्णा मंदिराकडे आकर्षित झाला आहे. त्याचा मृत्यू मंदिराशेजारील पाण्याचा तीर्थकुंडामध्ये होणे प्रतीकात्मक असून मानवी अंताच्या समयी सर्जक पाण्याशी त्याचा संबंध आणि मातेचेच प्रतीक असलेले तीर्थकूंड याठिकाणी महत्त्वाचे वाटते. रामण्णाच्या अशा जीवनाचा शेवट हा मानवजातीच्या शेवटचा प्रतीकात्मक इतिहास आहे. 'हा आणखी एक' या गूढ आवाजावरून यापूर्वीही जीवनरहस्याचा शोध घेण्यासाठी नायक आले आणि त्यांच्या जीवनाचा शेवट असाच झाला याचे सूचन करते. जी.ए. कुलकर्णी यांच्या सर्वच कथांमधून स्वात्मरूपाचा, जीवनरहस्याचा शोध घेणारा प्रवासी पराभूत झालेला दिसतो. या कथेतील रामण्णाही शेवटी पराभूत झाला आहे. मानवी जीवनाच्या वास्तवाचा शोध आणि मृत्यू या एकाच वेळेच्या घटना असल्याचे जी.

ए. कुलकर्णी चित्रित करतात. म्हणून नियतीचे मानवी जीवनावरील प्राबल्य त्याची कोणतीच कथा नाकारत नाही. 'गीतपाखरु' कथेचा अपवाद वगळता त्यांचे सर्व नायक जीवनाच्या प्रवासात शेवटी पराभूत होतात; पण हा पराभवही एका अर्थाने विजयच असतो. निसर्गातील रहस्याचा शोध आणि मानवजातीचे अंतिम वास्तव अशाच वीरनायकांना कळते. त्यामुळे रामण्णा हाही वीरनायकच आहे. गारूडी, संन्याशी, भुत्या आणि अपंग मुलगा यांना हे जीवनरहस्य कळणे शक्य नाही. त्यासाठी रामण्णाच्या पातळीवरील जिज्ञासा आणि जीवनाबद्दलची संपलेली आसक्ती या बाबी महत्त्वाच्या असतात. जीवनरहस्याच्या शोधामध्ये मानव अपयशी ठरत असला तरी तेथपर्यंतचा त्याचा प्रवासही महत्त्वाचा आणि मानवी इतिहासाला श्रेष्ठत्व प्रदान करणारा असतो. या जीवनरहस्याच्या प्रवासाविषयी डॉ. द. भि. कुलकर्णी लिहितात. "जी. ए. कुलकर्णींना म्हणायचे आहे, ते जीवनरहस्य ना धनलोभ्यांना उलगडत (गारुडी), ना मृत्युपूजकाला गवसत (संन्यासी), ना भाविकाला (भुत्या), ना अगतिकाला (अपंग). रामण्णा त्या देवळापर्यंत पोचतो, हे खरे; पण तोही तिथून बाहेर फेकला जातो. हीच मानवजातीची सरहद्द आहे. मानवाला जीवनरहस्याचा बोध कधीच, कशानेच होऊ शकत नाही, असे जीएंना म्हणायचे आहे. यालाच अज्ञेयवाद म्हणतात नं? संशयवाद?"[२]

जी. ए. कुलकर्णी यांनी या कथेच्या माध्यमातून जीवनरहस्याचा शोध कोणाला लागू शकतो, तर ज्याच्या सर्व इच्छा, आकांक्षा, जगण्याची लालसा संपली आहे, हे सूचित केले आहे. या जीवनरहस्याच्या शोधासाठी रामण्णा जाणीवपूर्वक निघालेला नाही. तो एका ठिपक्याच्या जिज्ञासेपोटी प्रवास सूरू करतो. संन्याशाला असलेला ज्ञानगर्व, गारूड्यासारखा लोभ, भुत्यासारखी आंधळी भाविकता आणि अपंगासारखे हताशपण आणि मृत्युभय त्याला नाही. त्याची जिज्ञासा शुद्ध होती आणि अंत:करणात वात्सल्य होते. याचाच अर्थ मानवी जीवनाचे अंतिम वास्तव, जीवनरहस्य, किंवा स्वात्मरुपाची प्राप्ती गर्विष्ठ, लोभी, आंधळा भाविक, हताश आणि मृत्युभय असलेल्या माणसाला होणार नाही तर त्यासाठी शुद्ध जिज्ञासू वृत्तीची गरज आहे. हेच जीवनाचे वास्तव कथाकाराला सांगायचे असावे. या कथेमधून प्रवासाचा आदिबंध अतिशय प्रभावी व परिणामकारक आविष्कृत होताना दिसतो.

**संदर्भ :**

१. काजळमाया, जी.ए.कुलकर्णी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, सातवी आवृत्ती, २००९, पृष्ठ.११७
२. जीएंची महाकथा, द. भि. कुलकर्णी, आकांक्षा प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, २००८ पृष्ठ.७६

◆◆◆

ISSN : 2348 – 604X (Print)
ISSN : 2348 – 6058 (Online)



# ISJ

# International Science Journal

(Peer-Reviewed)
Online and Print Version



| Volume 7 | Special Issue | 2020

Proceedings of the International Conference on Science and Science Fiction Organised by Shri Mukatanand College, Gangapur, Aurangabad, Maharashtra - India, 10th & 11th January, 2020

**Published Online at : http://www.sciencejournal.in**

IMPACT FACTOR 7.9

# ISJ

## INTERNALTIONAL SCIENCE JOURNAL

(Peer Reviewed)

ISSN - 2348-604X (Print)
ISSN - 2348-6058 (Online)

## PROCEEDINGS OF THE INTERNATIONAL CONFERENCE ON SCIENCE AND SCIENCE FICTION ORGANISED BY SHRI MUKTANAND COLLEGE, GANGAPUR, AURANGABAD (MS) - INDIA ‖ 10th & 11th January, 2020

Volume 07 ‖ Special Issue ‖ 2020
Published Online at http://www.sciencejournal.in

ISJ
International Science Journal
Peer-reviewed
www.sciencejournal.in
DAMA INTERNATIONAL


| | | | |
|---|---|---|---|
| १८ | निरंजन घाटे यांचा 'दॅट क्रेझी इंडियन' | डॉ.एम.ए.कव्हळे | ११७ |
| १९ | उत्तम आरोग्यासाठी 'सूर्यनमस्कार' | प्रा. डॉ. विजय काशिनाथ पडवळ | १२१ |
| २० | म्हणीतील वैज्ञानिक दृष्टिकोन : एक अभ्यास | प्रा. डॉ. हनुमंत तुकाराम माने | १२३ |
| २१ | आदिवासी म्हणीतून व्यक्त होणारे निसर्ग जीवन | प्रा. कवित्रा सिपु वळवी, | १२७ |
| २२ | डॉ. बाबासाहेब आंबेडरांचा संतति नियमना संबंधी वैज्ञानिक दष्टीकोन एक अभ्यास | प्रा. रमेश बापूराव जोगदंड | १३१ |
| २३ | मराठीतील वैज्ञानिक कथा साहित्य | प्रा. मोहन सौंदर्य | १३५ |
| २४ | मराठी विज्ञान कथा | डॉ. युवराज थबडगे | १३८ |
| २५ | थेरीगाथा विज्ञानाशी सुसंगत असणारे काव्य | सहा.प्रा.भारत सुर्यभान सिरसाट | १४३ |
| २६ | विज्ञान कथा आणि मानवी जीवन जयंत नारळीकर यांच्या 'स्फोट' या कथेच्या अनुषंगाने | डॉ. रेखा कचरूजी मेश्राम | १४६ |
| २७ | लोकवाङ्मय आणि विज्ञान साहित्य | डॉ. चत्रभुज बालासाहेब कदम | १५१ |
| २८ | मराठी विज्ञान कथांचे स्वरुप | डॉ. एम. के. शिंदे | १५६ |
| २९ | "बाळ फोंडके आणि व्हर्च्युअल रिॲलिटी" | अभिमन्यू राजगुरु | १६१ |
| ३० | सावित्रीबाई फुले यांच्या कवितेतील वैज्ञानिक दृष्टीकोण | गायत्री आनंदराव भरनाळे | १६५ |
| ३१ | "विज्ञान साहित्य आणि महात्मा बसवेश्वरांच्या साहित्यातील वैज्ञानिक जाणिवा" | प्रा. डॉ. मनोहर सिरसाट<br>रेणुका शिवलिंगआप्पा संभाहरे | १७१ |
| ३२ | विज्ञान साहित्यिक- वैज्ञानिक लेखक बाळ फोंडके | प्रा. मकासरे संगीता भास्कर | १७६ |
| ३३ | 'महात्मा गांधीच्या सत्याग्रहाचा वैज्ञानिक दृष्टीकोण" | प्रा. के.एस. बन | १८० |
| ३४ | अवतार चित्रपटातीलविज्ञान आणि पर्यावरण संबंधः एक अध्ययन | डॉ.गणेश मदनराव शिंदे, | १८२ |
| ३५ | आधुनिकजीवन योग व ध्यान | डॉ.लीला सुखदेव बनसोडे | १८७ |
| ३६ | प्रेषित : मानव आणि परग्रहवासी यांच्यातील भावबंध | रोहिणी गजानन रेळेकर | १९० |
| ३७ | विज्ञानकथा : विज्ञानकथेतील कल्पनाविश्व | पद्मराज प्रमोद सांगोले | १९५ |
| ३८ | जयंत नारळीकरांच्या ललित विज्ञान लेखांचा आशय | संगीता साईप्रकाश आरळी | २०४ |

ISJ
International Science Journal
Peer-reviewed
www.sciencejournal.in

१८

# निरंजन घाटे यांचा 'दॅट क्रेझी इंडियन'

**डॉ.एम.ए.कव्हळे**
साहाय्यक प्राध्यापक,मराठी विभाग
सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव
भ्रमणध्वनी-९७६४९२६९३९

विज्ञान कथांनी मराठी वाङमयामध्ये आता मोलाची भर घालण्यास सुरूवात केली आहे. विज्ञान कथांचा संख्यात्मक विचार करता संख्या फारशी दिसत नसली तरी मराठीमध्ये या कथांनी ब•यापैकी मुळ धरलेले दिसते. निरंजन घाटे हे नाव आज विज्ञान कथांच्या संदर्भात सर्वदूर पसरले आहे. मानव आणि यंत्रयुग, वैज्ञानिक प्रगती व प्रगतीचा मानवी जीवनावर पडणारा चांगला व वाईट परिणाम त्यांची कथा चित्रित करते. २०१५ मध्ये त्यांचा घ्दॅट क्रेझी इंडियनङ नावाचा कथासंग्रह प्रकाशित झाला. या कथासंग्रहातील कथामधूनही विज्ञानाचा मानवी जीवनावर झालेला परिणाम व वैज्ञानिक प्रगतीमुळे बदललेले मानवी जीवन निरंजन घाटे चित्रित करतात.

मराठीमध्ये विज्ञान साहित्याचा प्रवाह १९७५ नंतर उदयाला आला. 'विद्यमान विज्ञानतंत्रज्ञानाच्या प्रगतीचा भविष्यकाळात प्रक्षेप करून भविष्यकाळातील मानवी जीवनावर त्याचा कोणता परिणाम झालेला असेल, त्या काळातील समाज कसा असेल, मानवी परस्परसंबंध कसे असतील, याचे चित्रण करणारे साहित्य म्हणजे विज्ञान साहित्य इंग्रजीत अशा साहित्याला सायन्स फिक्शन म्हणतात'१ विज्ञान साहित्यामध्ये विज्ञान कथा हा वाङमयप्रकार महत्त्वपूर्ण व विपूल प्रमाणात लिहिला गेलेला आहे. वैज्ञानिक संकल्पनेचा पाया या विज्ञानकथांना असतो. एखादी वैज्ञानिक संकल्पना कथानकाच्या गुंफणित गुंफून एक सुंदर, वाचनीय कथा निर्माण करावी लागते. विज्ञानकथेच्या लेखनाबद्दल लक्ष्मण लोंढे म्हणतात,'एका बाजूने विज्ञानकथेचा विज्ञानाशी एवढा घनिष्ट संबंध असतो, नातं असतं. दुस•या बाजूला ती एक सुंदर, वाचनीय कथाही असणं तितकचं आवश्यक असतं. चांगल्या कथेला आवश्यक असे सगळे पैलूही त्या कथेत असले पाहिजेत, म्हणजेच भाषेचं सौदर्य, सुंदर कथानक, व्यक्तिचित्रण,संवाद, कथेतील पात्रांचे मनोव्यापार, त्यांचे विकार, विचार, त्यांचे परस्परसंबंध हया सर्वांची चांगल्या विज्ञानकथेत इतर कोणत्याही कथेइतकीच गरज असते. त्यामुळेच हा अवघड लेखनप्रकार आहे.'२ विज्ञान कथांचे विषय पाहिले तर मानवी प्रगती, वैज्ञानिक शोध, यंत्रमानव, परग्रह, परग्रहावरील जीवन, मानवातील स्पर्धा, हेवेदावे, डावपेच, मानवावर यंत्रयुगाचा झालेला परिणाम, संपत चाललेली कार्यसंस्कृती, मानवी जीवनात यंत्राचा होणारा हस्तक्षेप अशा विषयाचा भरणा जास्त दिसतो.

निरंजन घाटे यांचा 'दॅट क्रेझी इंडियन' हा अशाच मानवी जीवनावर यंत्रयुगाचा होणारा परिणाम चित्रित करणारा आहे. मानवाने स्वत:च्या विकासासाठी, जीवन अधिक सुलभ व्हावे म्हणून, मानवी विकासाला गती मिळावी यासाठी अनेक नवनवीन शोध लावले. आपल्या बुद्धीच्या बळावर मानवाने वैज्ञानिक प्रगती केली. या प्रगतीमुळे मानवी जीवन अधिक सुलभ व सुसहय झाले. पण याच विज्ञानयुगाचा, यंत्रयुगाचा विपरित परिणामही मानवी जीवनावर झाला.


Volume 7 Special Issue1, 2020, ISSN: 2348 604X (p); 2348 6058 (e), Impact Factor 7.9 © 2020 DAMA International. Proceedings of the International Conference on Science & Science Fiction Organised by Shri Mukatanand College, Gangapur, Aurangabad (MS) India, 10th & 11th January, 2020. Editors reserve all rights.

त्यामुळे बुद्धी असलेला मानव यंत्राचा गुलाम बनत चालला आहे, हे वास्तव निरंजन घाटे या कथासंग्रहातून सांगतात. या कथासंग्रहातील कथांमधून मानवी जीवन झपाटयाने कसे बदलत आहे, मानवी जीवनामध्ये विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा वाढता वापर व काळानुरूप मानवी जीवनावर या बदलाचा होत असलेला दुष्परिणाम निरंजन घाटे चित्रित करतात. मानवाने कितीही वैज्ञानिक प्रगती केली तरी या प्रगतीला स्वीकारणारे मानवी मन त्याच्या पाठीमागे असते व मानवी विकारामुळे प्रगतीच्या ठिकाणी अधोगती होऊ शकते, याचा प्रत्यय या कथासंग्रहातील कथा आपणाला आणून देतात.

.

'दॅट क्रेझी इंडियन' ही या कथासंग्रहातील पहिलीच कथा सुमेध नावाच्या भारतीय माणसाची आहे. आपण प्रसिद्ध पुरूष व्हावं, जगाने आपल्याकडे आदरानं बघावं असं लहानपणापासून त्याला वाटत असे. क्रिकेटमध्ये आवड असलेला हा महत्त्वकांक्षी मुलगा क्रिकेटमध्ये आपले करिअर करू शकला नाही. नंतर त्याचा राजीव नावाचा मित्र नाटकात चमकला म्हणून त्याने नाटकाकडे वळायचे ठरविले पण त्यातही तो यशस्वी होऊ शकला नाही. शाळेत एका माजी विद्यार्थ्याचा विज्ञानाची कास धरल्यामुळे सत्कार झाला व विज्ञानाची कास धरल्यामुळे जग पुढे जात आहे, हे लक्षात आल्यानंतर तो विज्ञान शाखेत प्रवेश घेतो. 'विज्ञान शाखेत तो दाखल झाला तेव्हा त्याच्या लक्षात आलं की, वैज्ञानिकांना समाजात मान असतोच, पण त्यांच्या चुका काढायला कुणी धजावत नाही. त्यांना बक्षिसे मिळतातच पण काही जण तर चक्क पंतप्रधानाचे सल्लागार बिल्लागार बनतात. तसंच विज्ञान क्षेत्रातील व्यक्तींना परदेशात जाण्याची संधी आणि परदेशात नोक•याही अधिक प्रमाणात उपलब्ध होतात.'३ हे ऐकून तो पीएच.डी. करण्याकडे वळाला आहे. जौवतंत्रज्ञानाच्या क्षेत्रात त्याने अभ्यास सुरू केला. त्याला अमेरिकेच्या एका विद्यापीठात नोकरी मिळाली. पण त्याची प्राध्यापक व विभागप्रमुख होण्याची इच्छा मात्र अपुरी राहिली. त्याचवेळी नियतीने त्याला ती संधी आणून दिली. हे संशोधन केंद्र चालविण्यासाठी पैसा गोळा करायचा म्हणून विभागप्रमुखाने बैठक बोलावली. या बैठकीमध्ये सुमेधने भारतीय लोकांसाठी हमखास मुलगा होण्याचा उपाय सांगून पैसा उभा करण्याचा सल्ला दिला. त्यासाठी या संशोधन केंद्राने विज्ञानाचा दुरूपयोग केला. काही काळानंतर हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर विभागप्रमुखाला राजीनामा दयावा लागला व सुमेध विभागप्रमुख झाला. वेगवेगळया संशोधनामुळे व त्याच्या गैरवापरामुळे सुमेधचा विभाग अधिक श्रीमंत झाला, त्याबद्दल त्याचा सत्कार करण्यात आला. मानवाने आपल्या स्वार्थासाठी, आपल्या महत्त्वकांक्षा आणि अतिहव्यासापायी विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा गैरवापर करायला सुरूवात केली. त्यामुळे मानवी जीवन अधिक समृद्ध होण्याऐवजी अधिक किचकट व परावलंबी बनत चालल्याचे सूचन कथाकार करताना दिसतो.

.

'अफरातफर' नावाची कथा अशाच विज्ञानाच्या गैरवापरातून झालेल्या संततीची व त्याच्या बापाच्या मनाविकाराची कथा आहे. या कथेतील नायकाचा बाप त्याचा नेहमी तिरस्कार करतो. त्याचे कारण विज्ञानाचा उपयोग करून त्याचा जन्म झालेला असतो. पण डॉक्टरने वडिलाच्या वीर्याऐवजी स्वत:चे वीर्य वापरले असल्याच्या शंकेतून हे मूलाचे व वडिलाचे भावविश्व उध्वस्त झालेले दिसते. पैसा कमविण्याच्या प्रयत्नात डॉक्टरी पेशाला काळीमा फासण्याचे काम काही महत्त्वकांक्षी डॉक्टर करतात व त्याचे दुष्परिणाम समाजात होताना दिसत आहेत.

अशाच्या एका महत्त्वकांक्षी आईने स्वत:च्या अपेक्षा आपल्या मुलावर लादून आणि विज्ञानाच्या गैरवापर करून स्वत:च्या मुलाचे जीवन कसे उध्वस्त केले, याची हकिकत 'मला माफ कर' या कथेतून चित्रित झाली आहे. ही आई

स्वत: धावपटू होती, तिचा पतीही प्रशिक्षक होता. जीवनात स्वत:ला बरेच काही करायचे होते पण ती इच्छा मुलाकडून पूर्ण करून घ्यावी यासाठी ती छोटया मुलाला धावपटू बनविते. त्याच्याकडून नेहमी पदकाची अपेक्षा ठेवते व या अपेक्षा पूर्ण होण्यासाठी त्याच्यावर जैवतज्ज्ञाकडून, जॅककडून विज्ञानाचे आघोरी प्रयोग करते. आयजीएफ १ नावाचा एक जीन त्याच्या शरीरामध्ये सोडला जातो. त्यामधून त्याला रक्ताचा कर्करोग होतो आणि त्यात मुलाचा मृत्यू होतो. आईच्या हव्यासापायी व विज्ञान तंत्रज्ञानाच्या गैरवापरामुळे मुलाचा नाहक बळी जातो. याचा परिणाम होऊन पुत्रशोकामुळे ती आईही एक दिवस आत्महत्या करते. नौसर्गिक प्रगतीला बाधा आणल्यामुळे व अधिक चांगला निकाल येण्यासाठी विज्ञानाच्या केलेल्या अतिवापरामुळे मानवी जीवन प्रभावित होत असून नष्ट होत असल्याचे सूचन ही कथा करते.
.

आजचे युग हे जागतिकीकरणाचे युग आहे. या जागतिकीकरणाने मानवी जीवनावर फार मोठा परिणाम केला आहे. माहिती व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात मोठया प्रमाणात झालेली वाढ हे या काळाचे वैशिष्टये आहे. या काळामध्ये मानवाने भौतिक प्रगती मोठया प्रमाणात केली असली तरी मानवी मूल्याच्या पातळीवर मात्र कमालीची घसरण झालेली आपणास पहावयास मिळते. पैसा आणि प्रतिष्ठेपायी जवळची नाती दूर जात आहेत. पैसा आणि संपत्तीच्या लोभापायी नाती विस्कटत आणि तुटत चालली आहेत. अशाच नात्याच्या तुटलेपणाचे चित्रण 'सदोष मातृत्व' या कथेतून आले आहे. समीर आणि सतीश या एकाच मातेचे पुत्र असलेल्या पण परिस्थिती व नियतीमुळे वेगवेगळया घरात राहणा•या दोन भावांची ही कथा आहे. जीवनाच्या एका वाटेवर या दोन भावांची अचानक भेट होते आणि भुतकाळातील विणलेल धागे उकलायला लागतात. यातच त्याच्या आजोबाने मृत्यूपुर्वी तयार केलेल्या मृत्यूपत्रात आपली संपत्ती सर्व वारसांनी समान वाटण्याचे लिहिल्यामुळे यांच्या आईच्या हिस्स्याचा प्रश्न उपस्थित होतो. या दोघांनाही त्या संपत्तीत फारसा रस नसला तरी त्यांचा मामा आणि मामी संपत्तीच्या लोभापायी व स्वार्थापोटी त्यांची आई ही वारस नाही असा दावा करतात. आपल्या आईच्या अस्तित्वावरच प्रश्न उपस्थित केल्यामुळे सतीश व समीर मामाविरोधात कोर्टात केस लढण्याचा निणऱ्य घेतात. न्यायाधीशाच्या आदेशानुसार सर्व आपत्याची डीएनए चाचणी करण्याचे ठरते आणि या चाचणीचा निकाल अतिशय धक्कादायक लागतो. ज्या मामाने आपल्या बहिणीच्या नात्यावर आक्षेप घेतला तो मामाचं त्याच्या वडिलाचे अपत्य नसल्याचे डीएनए चाचणीतून निष्पन्न होते. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या काळात माणूस या तंत्रज्ञानावर पूर्णपणे अवलंबून राहत आहे. तंत्रज्ञानाने दिलेली चाचणी व अहवाल डोळे झाकून मान्य करत आहे. पण या यंत्राच्या आणि रिपोर्ट तयार करणाराच्याही काही मर्यादा आहेत हे आपण समजून घेतले पाहिजे. यंत्राने व तंत्रज्ञानाने दिलेले परिणाम चुकीचे असू शकतात हेही आपण मान्य करायला हवे. याविषयी या कथेतील कौशिक यांचे विधान महत्त्वाचे आहे. ते म्हणतात, 'चर्कीनं या निकालाविरोधात वरच्या न्यायालयात धाव घेतली तेव्हा तज्ज्ञांनी ज्या साक्षी दिल्या त्यात या चाचण्यात मानवी चुका होऊ शकतात असा निकाल देणं वरिष्ठ न्यायालयास भाग पडलं. एका प्रयोगशाळेतला अशा चाचण्या करणारा तज्ज्ञ दर चार मिनिटाला एक चाचणी या वेगाने दहा तास काम करीत होता. त्यानंतर अशा चुका नक्कीच होत असतील कारण काही वेळा कामाचा ताण असहय होतो.'४ एकंदरीत मानव तंत्रज्ञानावर विसंबून राहत असून या तंत्रज्ञानाच्या वापरामुळे व चुकीच्या निष्कर्षामुळे मानवी जीवन मात्र प्रभावित होताना दिसते.


Volume 7 Special Issue1, 2020, ISSN: 2348 604X (p); 2348 6058 (e), Impact Factor 7.9 © 2020 DAMA International. Proceedings of the International Conference on Science & Science Fiction Organised by Shri Mukatanand College, Gangapur, Aurangabad (MS) India, 10th & 11thJanuary, 2020. Editors reserve all rights.

ISJ
International Science Journal
Peer-reviewed
www.sciencejournal.in

यंत्रयुगात मानव यंत्रावर मोठया प्रमाणात अवलंबून राहत आहे. माणसाचा माणसावरील विश्वास कमी होत असून यंत्रावर अधिकाधिक विश्वास दृढ होत आहे. संगणक अथवा कोणत्याही यंत्राने दाखविलेला परिणाम आपण कोणत्याही तक्रारीविणा मान्य करत आहोत. याचाच अर्थ स्वावलंबी माणूस यंत्रयुगात कमालीचा परावलंबी बनत चालला आहे. यंत्रामुळे वेळेची व क्रयशक्तीची बचत होताना दिसत असली तरी यामुळे मानवातील अनेक कौशल्यांचाच •हास होत असल्याचे सत्य आपणास नाकारता येत नाही. आदिमानवापासून आजपर्यंत मानवाने केलेले संशोधन, जगण्याविषयी घालून घेतलेली बंधने, नितीमूल्ये बाजूला ठेवून माणूस यंत्रयुगात यंत्राच्या आहारी जाताना दिसत आहे. भविष्यकाळात या यंत्राचा अधिक प्रभाव व शिरकाव मानवी जीवनामध्ये झालेला दिसेल. या प्रश्नावर आधारीत या कथासंग्रहामध्ये 'तेव्हा उशीर झालेला असेल' ही कथा महत्त्वपूर्ण व अर्थपूर्ण वाटते. ही कथा मानवी भविष्याबद्दलची आहे. भविष्यात मानव वेगवेगळया ग्रहावर वस्ती करेल. अशाच एका घ्उद्योग श्रीङ ग्रहावरील ही हकीकत आहे. पृथ्वीवरील सर्व उद्योगप्रिय नागरिकांनी एकत्र येऊन या ग्रहावर वसाहत केलेली असते. या ग्रहावर इतर ग्रहावरील कुशल व अकुशल कामगारांची ये जा सुरू होती आणि याच्या नोंदी ठेवण्यामध्ये फार मोठा घोटाळा झालेला निदर्शनास येतो. हा सर्व घोळ यंत्रमानवाने केलेला असतो. मानवाने आपल्या विलासी व चौनी जीवनासाठी सर्व जबाबदा•या यंत्रमानवावर सोपवल्या. विलासी आणि आळशी बनलेल्या मानवाने आपले सर्वस्व यंत्रमानवाच्या स्वाधीन केले आणि त्याचा गौरफायदा घेत यंत्रमानवाने या ग्रहावर स्वतःचे वर्चस्व प्रस्थापीत करायला सुरूवात केली. हीच परिस्थिती कायम राहिली तर मानव एक दिवस यंत्रमानवाचा गुलाम झाल्याशिवाय राहणार नाही आणि ही गुलामी स्वतः मानवाने स्वीकारलेली किंवा स्वतःवर ओढावून घेतलेली असेल, हे सूचन या कथेतून करण्यात आले आहे.

एकंदरीत महत्त्वकांक्षी मानवांनी आपल्या महत्वकांक्षा पूर्ण करण्यासाठी, संपत्तीच्या हव्यासापायी, चौनी आणि विलासी जीवन जगण्यासाठी, स्वतःची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी, समाजात मान सन्मान मिळविण्यासाठी, स्वतःमधील कमतरता लपविण्यासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा गौरवापर करावयास सुरूवात केली आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान जेवढे मानवी विकासाला पुरक व साहाय्यक आहे, तेवढाच त्याचा स्वार्थासाठी केलेला उपयोग धोकादायक असतो. मानवी महत्वकांक्षा आणि विकाराच्या प्रभावातून मानव विज्ञान तंत्रज्ञानाच्या वापरातून स्वतःचेच जीवन उध्वस्त करताना दिसतो आहे. 'दॅट क्रेझी इंडियन' या कथासंग्रहातून अशाच्या तंत्रज्ञानाच्या दुष्परिणामावर निरंजन घाटे यांनी भाष्य केले आहे.

संदर्भ :

१. निरंजन घाटे, मराठी वाङमयाचा इतिहास, खंड सातवा भाग पहिला, महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, पहिली आवृत्ती, मे २००९, पृष्ठ ३२६

२. लक्ष्मण लोंढे, वाळूचं गाणं, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती, जानेवारी १९९५, पृष्ठ १

३. निरंजन घाटे, दॅट क्रेझी इंडियन, दिलीपराज प्रकाशन, पुणे, डिसेंबर २०१५, पृष्ठ १०

४. निरंजन घाटे, दॅट क्रेझी इंडियन, दिलीपराज प्रकाशन, पुणे, डिसेंबर २०१५, पृष्ठ ६२

Studies in Indian Place Names (UGC Care Journal)
ISSN: 2394-3114Vol-40, Special Issue-05
NAAC sponsored two days National Conference on New Accreditation Process and Quality Enhancement for rural colleges
Held on 4 and 5th February 2020
SunderraoSolankeMahavidyalaya, Majalgaon Dist. Beed, Maharashtra, India. 431 131

# मराठीच्या अध्यापनात माहिती तंत्रज्ञानाचा वापर

डॉ.एम.ए.कव्हळे
साहाय्यक प्राध्यापक,मराठी विभाग
सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव
भ्रमणध्वनी-9764926939

शिक्षण माणसाला समृद्ध बनवते, चांगला सुसंस्कृत मनुष्य घडवणे हे शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट आहे. शिक्षणाचा उद्देश केवळ पदवी मिळवणे किंवा उच्चविद्याविभूषित होणे नसून मानवाचे वर्तन आणि व्यक्तिमत्व घडविण्यासाठी शिक्षणाची व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. याविषयी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण म्हणतात, "माणसाचे मन शिक्षणाच्या संस्काराने अधिक संपन्न केल्याशिवाय समाज खऱ्या अर्थाने समाज बनत नाही. शेती सुधारली, हाती थोडाफार पैसा आला, नवीन बागायती शेतीने फुललेले शिवार दिसले, पण त्या शिवाराच्या पाठीमागे असणारे मन असंस्कृत राहिले तर त्या शिवाराचा काही उपयोग नाही." त्यामुळे हे मन सुसंस्कारित करायचे असेल तर शिक्षणामध्ये अध्ययन आणि अध्यापन या प्रक्रियेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. शिक्षणाच्या प्रक्रियेमध्ये शिक्षण घेण्याचा उद्देश काय हे पाहणे अत्यंत महत्त्वाचे आहे, कारण ज्या उद्देशाने आपण एखादी गोष्ट करतो त्या उद्देशावरच त्या गोष्टीची यशस्वीता अवलंबून असते. शिक्षणाचा उद्देश जर समृद्ध असा माणूस घडविणे असेल तर शिक्षणाच्या अध्ययन आणि अध्यापन प्रक्रियेमध्ये चांगला माणूस घडवण्यासाठीची प्रक्रिया येणे अपेक्षित आहे. .

भाषा आणि साहित्य याचा अभ्यास शिक्षणामध्ये अतिशय महत्त्वाचा आहे. भाषा ही विचार करण्याचे साधन आहे आणि विचारांची देवाणघेवाण करण्याचे माध्यम आहे. त्यामुळे भाषेचा अभ्यास करत असताना भाषेचा अभ्यास आणि साहित्याचा अभ्यास या दोन स्तरावर अभ्यास करावा लागतो. साहित्य जीवन जगण्याची कला शिकवते, माणसाला घडवण्याचे काम करते. नीतिमूल्ये आणि विवेक साहित्यामुळे निर्माण होतो. साहित्य आम्हाला आजूबाजूच्या परिस्थितीचे भान निर्माण करून देते, त्याचबरोबर माणसांमधील माणूसपण शिकवते. भाषा हे

समाजाच्या व्यवहाराचे आणि विचाराच्या आदान-प्रदानाचे माध्यम आहे. त्यामुळे भाषेचा अभ्यास हा स्वतंत्रपणे करावा लागतो. साहित्य आणि भाषा या दोन्हीच्या अभ्यासामध्ये फरक आहे, याबाबत झालेली गल्लत जर दूर झाली नाही तर साहित्य यालाच लोक भाषा समजून त्याचा अभ्यास करायला लागतात. मग भाषेचा अभ्यास करायचा म्हणजे नेमके काय करायचे हे आपण ठरवले पाहिजे. भाषेचा अभ्यास करणे म्हणजे कुठल्याही भाषेतील किमान कौशल्ये आत्मसात करणे होय. .

आजचे युग हे जागतिकीकरणाचे, स्पर्धेचे युग आहे. अशा स्पर्धेच्या युगामध्ये, जागतिकीकरणाच्या युगामध्ये आपल्याला भाषेचा अभ्यास करण्यासाठी व भाषेचे अध्ययन आणि अध्यापन करण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाच्या नवनवीन साधनांचा वापर करणे आवश्यक आहे. माहितीचे संकलन करणे, माहितीच्या संकलनामध्ये गती येणे, अद्ययावत ज्ञान संपादन करणे, काळाबरोबर चालणे या सर्वांसाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर आवश्यक झाला आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या या काळामध्ये ज्ञानाची साधने बदलली, ज्ञानाची माध्यमे बदलली त्याचबरोबर अध्ययन आणि अध्यापनाच्या पद्धतीमध्ये सुद्धा बदल झाला. माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून अध्यापन करणे आता महत्त्वाचे होऊ लागले आहे. त्यामुळे याठिकाणी मराठीच्या अध्यापनासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर कशापद्धतीने करू शकतो याविषयी विचार व्यक्त करणे महत्त्वाचे ठरते. .

पावर पॉइंट प्रेझेंटेशन :

जागतिकीकरणाच्या काळामध्ये युवक झपाट्याने पुढे जात आहे. ज्ञानाची साधने बदलली, अशा काळामध्ये अध्यापनाच्या प्रक्रियेमध्ये बदल होत असून पावर पॉइंट प्रेझेंटेशनला अतिशय महत्त्वाचे स्थान आले आहे. मराठीसारखा भाषा विषय शिकवताना काळाच्या ओघात अनेक संकल्पना मागे पडलेल्या दिसून येतात, अनेक शब्द, अनेक प्रतिमा यांचा उलगडा अलीकडच्या पिढीला होताना दिसत नाही. शब्दांचे ज्ञानही कमी होत चालले आहे. वाचन संस्कृती कमी झाल्यामुळे अनेक गोष्टींबद्दल मुलांना ज्ञान नसल्याचे दिसते. ग्रामीण भागातल्या अनेक संकल्पना नष्ट झालेल्या आहेत, तंत्रज्ञानाच्या आणि विज्ञानाच्या प्रगतीमुळे माणूस झपाट्याने पुढे

जात आहे. पण पुढे जाताना अनेक गोष्टी मागे सोडून जात आहे. अशा काळात मराठी भाषा आणि साहित्य शिकवत असताना अनेक शब्द, अनेक प्रतिमा, अनेक संकल्पना अशा येत आहेत की, ज्याविषयी विद्यार्थ्यांना कुठल्याही प्रकारची माहिती नाही. अशावेळी पावर पॉइंट प्रेझेंटेशनचा वापर केल्यास चित्र, आवाज आणि व्हिडिओच्या माध्यमातून या गतकाळातील गोष्टी आपण विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष दाखवू शकतो. त्यामुळे त्यांच्यामध्ये आकलनाची अधिक क्षमता निर्माण होईल. या गोष्टी त्यांना माहीत होतील आणि त्यांना प्रत्यक्ष किमान डोळ्याने बघता येतील. पावर पॉइंट प्रेझेंटेशनच्या वापराने विद्यार्थ्यांचे अवधान खेचून घेणे, विद्यार्थ्यांना माहीत नसलेल्या व प्रत्यक्ष न बघितलेल्या गोष्टी दाखवून देणे, मोटिवेशनपर व्हिडिओच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये अधिक ऊर्जा निर्माण करणे, त्यांच्यातील क्षमतांना फुंकर घालणे शक्य होते.

मोडूल :

स्पर्धेच्या युगामध्ये आणि माहिती तंत्रज्ञानाच्या काळामध्ये अध्यापनाच्या प्रक्रियेमध्ये मोडूलचा वापर करण्यात येत आहे. नवीन काळाची पावले ओळखून विद्यार्थ्यांना अद्ययावत ज्ञान आणि अद्ययावत शिक्षण देण्यासाठी मोडूल संकल्पना उच्च शिक्षणामध्ये आली आहे. विद्यार्थ्यांना फक्त वर्गामध्ये खडू आणि फळा यांच्या माध्यमातून ज्ञान देण्यापेक्षा आता प्राध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थी हा 24 तास संपर्कात राहिला पाहिजे, यासाठी शिक्षण क्षेत्रामध्ये मोडूल नावाची संकल्पना आली आहे. यामध्ये फोर कॉर्टर मोडूल, याचबरोबर वेगवेगळ्या मोबाईल ॲप्लिकेशनच्या माध्यमातूनही शिक्षण शिकवण्याची, अध्यापनाची नवीन संधी उपलब्ध झाली आहे. गूगल क्लासरूमसारख्या मोडूलच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपल्या विषयाचे अध्ययन घरी बसल्या व 24 तास मिळू शकते. या गूगल क्लासरूमवरून विद्यार्थ्यांची बॅच तयार करणे, विद्यार्थ्यांना लेखी स्वरूपाच्या नोट्स देणे, ऑडिओ आणि व्हिडिओच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना संकल्पना स्पष्ट करून सांगणे, त्याचबरोबर विद्यार्थ्यांची परीक्षा घेणे, त्यांचा निकाल जाहीर करणे या सर्व गोष्टी करता येऊ शकतात. त्यामुळे या मोडूलचा वापर अध्ययन, अध्यापन पद्धतीमध्ये अनिवार्य झाला आहे. विद्यापीठ अनुदान आयोगसुद्धा याबाबतीत

**Studies in Indian Place Names (UGC Care Journal)**
*ISSN: 2394-3114Vol-40, Special Issue-05*
NAAC sponsored two days National Conference on New Accreditation Process and Quality Enhancement for rural colleges
Held on 4 and 5th February 2020
SunderraoSolankeMahavidyalaya, Majalgaon Dist. Beed, Maharashtra, India. 431 131

गांभीर्याने विचार करत असून प्राध्यापकांच्या पदोन्नतीसाठी लागणाऱ्या गुणांसाठी या मोडूलचा वापर करणारासाठी दहा गुणांची तरतूद केली आहे. याचा अर्थ असा की भविष्यकाळामध्ये या मोडूलचा वापर करून अध्ययन आणि अध्यापन अधिक प्रभावी करणे आवश्यक बनले आहे. मराठीसारख्या विषयाच्या अनुषंगाने विचार करता एखादा छोटा कोर्स तयार करून या माध्यमातून शिकवला जाऊ शकतो. त्याचबरोबर असलेला विषय व अभ्यासक्रम या माध्यमातून अधिक प्रभावीपणे विद्यार्थ्यांपर्यंत नेता येऊ शकतो. असा प्रयोग केल्यास विद्यार्थ्यांमध्ये भाषेविषयी, साहित्याविषयी गोडी निर्माण होईल आणि विद्यार्थ्यांना अधिक आकलन होईल याबद्दल शंका नसावी. .

ई-ग्रंथालये :

अलीकडच्या काळामध्ये वाचनाची प्रक्रिया थोडी थंडावलेली दिसत असली तरी, ई-बुक ई-जर्नल या नवीन माहिती तंत्रज्ञानाच्या साह्याने तयार झालेल्या माहिती तंत्रज्ञानाच्या साधनांचा वापर वाढलेला दिसून येतो. ई-लायब्ररी ही संकल्पना तयार झाली असून जगातील कुठलेही पुस्तक, कोणत्याही वेळी, कोणत्याही क्षणी आणि अगदी माफक किमतीमध्ये आपल्यासाठी उपलब्ध होऊ शकते. इंटरनेटच्या माध्यमातून आपण कोणत्याही विषयावरच्या पुस्तकांची ऑनलाइन खरेदी करू शकतो. पुस्तक खरेदी करावयाचे नसल्यास अनेक ई-ग्रंथालये आपणासाठी उपलब्ध आहेत. या ग्रंथालयाची मापक शुल्क भरून आपण त्याचे सभासद होऊ शकतो. ग्रंथालयातील सर्व पुस्तके आपल्याला ऑनलाईन वाचता येऊ शकतात आणि वाचनाच्या माध्यमातून आपल्या ज्ञानाच्या कक्षा आपण वाढवू शकतो. अध्ययन आणि अध्यापन प्रक्रियेमध्ये ई-बुक आणि ई-जर्नल्सचा आपणाला वापर करता येऊ शकतो. ऑनलाईन बुक आणि ऑनलाइन जर्नलमुळे कुठल्याही अध्यापकाला अध्ययनासाठी सामग्री जमा करणे अगदी सोपे झाले आहे. मराठी भाषेचा विचार करता बुकगंगा व ई-रसिक यासारख्या अनेक संकेतस्थळावर पुस्तक विक्रीसाठी उपलब्ध आहेत. त्याचबरोबर महाराष्ट्रातील अनेक विद्यापीठातील ग्रंथालये, त्याचबरोबर देशभरातील आणि जगभरातील ग्रंथालये आपणासाठी खुली आहेत. याचा वापर

Studies in Indian Place Names (UGC Care Journal)
ISSN: 2394-3114Vol-40, Special Issue-05
NAAC sponsored two days National Conference on New Accreditation Process and Quality Enhancement for rural colleges
Held on 4 and 5th February 2020
SunderraoSolankeMahavidyalaya, Majalgaon Dist. Beed, Maharashtra, India. 431 131

अध्यापकांनी अध्यापनासाठी केल्यास अध्यापनप्रक्रिया अधिक सुटसुटीत, अधिक सुलभ आणि विद्‌यार्थ्यांना अधिक प्रभावीपणे ज्ञान देणारी होईल.

संकेतस्थळे :

माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये संकेतस्थळे हे महत्वाचे माहितीचे दालन ठरत आहे. आज जगाचे सर्व ज्ञान इंटरनेटवर साठवलेले आहे. त्यामुळे आपल्या विषयाचे व भाषेचे ज्ञान करून घेण्यासाठी अनेक संकेतस्थळे महत्त्वपूर्ण ठरतात. मराठीच्या अध्यापनामध्ये संकेतस्थळांचा वापर करणे आता गरजेचे झाले आहे. जगाची ज्ञानाची भाषा इंग्रजी असली तरी मराठी भाषेतील हजारो संकेतस्थळे इंटरनेटवर उपलब्ध आहेत. या संकेतस्थळाचा वापर केल्यास आपण अधिक प्रभावीपणे अध्यापन करू शकतो. या संकेतस्थळांचा थोडक्यात विचार याठिकाणी करावयाचा आहे. मराठी भाषेचा विचार करता इंटरनेटवर www.mr.wikipedia.org नावाचे संकेतस्थळ अतिशय महत्त्वाचे आहे. या संकेतस्थळावर भाषा आणि साहित्य याविषयी अतिशय मौल्यवान माहिती उपलब्ध आहे. भाषा आणि साहित्य याअंतर्गत भाषा, भाषाविज्ञान, साहित्य, कथा, कविता, मराठीच्या प्रारंभापासून आजपर्यंतचे सर्व लेखक, कवी आणि साहित्यिक यांची सविस्तर माहिती या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. मराठीचा प्राथमिक आणि मूलभूत अभ्यास करावयाचा असल्यास व याविषयी अध्यापन करावयाचे असल्यास हे संकेतस्थळ सर्वांच्याच उपयोगी पडू शकते. याचबरोबर www.mymarathi.com इंटरनेट वरील संकेतस्थळ मराठीच्या अध्यापनासाठीमहत्त्वाचे ठरेल. पुस्तक परिचय यामध्ये अनेक पुस्तकांचा परिचय संकेतस्थळावर करून देण्यात आला आहे. मराठी संस्कृती आणि त्यासंदर्भातील सर्व बाबींच्या नोंदी या संकेतस्थळावर आपणास पहावयास मिळतात. मराठी सण, भक्तीपरंपरा, बालकथा, बालकविता, मराठी कविता, मराठी कथा, मराठी नाटक यासारख्या सर्व बाबींचा याठिकाणी अंतर्भाव दिसतो. .

. www.marathimati.com हे संकेतस्थळ मराठी भाषेतील मराठी लेखांच्या संदर्भामध्ये महत्त्वाचे संकेतस्थळ आहे. या संकेतस्थळावर मराठी भाषा आणि साहित्य याविषयीचे वेगवेगळे लेख उपलब्ध आहेत. या लेखांच्या माध्यमातून साहित्याविषयी व वैचारिक मत घडण्यासाठी मदत होऊ शकते. या संकेतस्थळांचा अभ्यास केल्यानंतर आपले अध्यापन अधिक प्रभावी करता येऊ

Studies in Indian Place Names (UGC Care Journal)
ISSN: 2394-3114Vol-40, Special Issue-05
NAAC sponsored two days National Conference on New Accreditation Process and Quality Enhancement for rural colleges
Held on 4 and 5th February 2020
SunderraoSolankeMahavidyalaya, Majalgaon Dist. Beed, Maharashtra, India. 431 131

शकते. या संकेतस्थळाबरोबरच www.marathimandali.com नावाचे संकेतस्थळ अतिशय महत्त्वाचे व प्रभावी वाटते. निबंधाचा अभ्यास करण्यासाठी या संकेतस्थळावर माहिती उपलब्ध आहे. त्याचबरोबर मराठीतील म्हणी या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. मराठी व्याकरण, मराठीतील ओव्या, मराठी साहित्य, मराठी लोककला यासंदर्भातील विस्तृत विवेचन याठिकाणी उपलब्ध आहे. मराठी संकेतस्थळामध्ये www.manase.org हे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे संकेतस्थळ राजकीय वाटत असले तरी मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीच्या अभ्यासाच्या दृष्टीने या संकेतस्थळावर मोठ्या प्रमाणामध्ये माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे. मराठी कथा, मराठी कविता, मराठी कादंबरी याविषयी विस्तृत लेखन याठिकाणी आहे. महाराष्ट्राच्या लोककलामध्ये सर्व लोककलांचा विचार आणि साधकबाधक चर्चा या संकेतस्थळावर घडवून आणण्यात आली आहे. मराठीतील सर्व संत, त्यांचे लेखन, यांचे जीवनचरित्र आणि त्यांच्या कार्याचा आढावा घेण्याचा प्रयत्नही या संकेतस्थळावर करण्यात आलेला आहे. संकेतस्थळ राजकीय असले तरी मराठी भाषा आणि साहित्याच्या दृष्टीने येथील माहिती मौल्यवान वाटते.

.

मराठी भाषा आणि संस्कृती याविषयी अतिशय महत्त्वाचे संकेतस्थळ म्हणजे www.khape.org. या संकेतस्थळावर मराठी भाषेतील पुस्तके अगदी मोफत उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. विशेषतः मध्ययुगीन मराठी साहित्यातील जवळपास सर्वच ग्रंथ याठिकाणी उपलब्ध आहेत. मुकुंदराजाच्या विवेकसिंधुपासून ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी, तुकारामांची गाथा, नाथांचे चतुश्लोकी भागवत आणि एकनाथी भागवत, नाथांची भारुडे, गवळणी, सर्व संतांच्या कविता, पंडिती साहित्यातील पंडितांच्या ग्रंथरचना, शाहिरांची लावणी आणि पोवाडे या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. कोणतेही शुल्क न खर्च करता याठिकाणावरून सर्व माहिती आपणास मिळू शकते. मराठीचे अध्यापन करत असताना मध्ययुगीन साहित्याच्या इतिहासाशिवाय पुढे जाणे शक्य नाही त्यामुळे या संकेतस्थळाचा वापर आपणास करता येऊ शकतो. या संकेतस्थळावर दिलेल्या माहितीमुळे, उपलब्ध ग्रंथामुळे आपल्याला मराठीचे अध्यापन अधिक सुलभ होऊ शकते. www.athwanitil-gani.com नावाचे एक मराठी कवितांचे दालन असलेले संकेतस्थळ इंटरनेटवर

उपलब्ध आहे. या संकेतस्थळांचे वैशिष्ट्य म्हणजे मराठीतील गाजलेल्या सर्व कविता, गझल, रचना या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. या सर्व कविता आणि रचना तीन प्रकारात उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. या कविता आपणास या संकेतस्थळावर वाचावयास मिळतात, त्याचबरोबर याची ऑडिओ क्लिप संकेतस्थळावर उपलब्ध आहे, तर बऱ्याच कवितांच्या व्हिडीओ क्लिपसुद्‌धा संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. त्यामुळे हे संकेतस्थळ मराठी कवितेच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे वाटते. आपणास कुठलीही कविता सापडत नसल्यास या संकेतस्थळाचा आधार घेऊन आपण ती कविता मिळू शकतो आणि आपल्या अध्ययन, अध्यापनामध्ये याचा वापर करू शकतो. कविता वाचून शिकवण्यापेक्षा ती गेय स्वरूपात, व्हिडिओ स्वरूपात विद्‌यार्थ्यांना दाखवली तर विद्‌यार्थ्यांना अधिक प्रभावीपणे समजू शकते. अशा काही मराठी संकेतस्थळाबरोबरच आणखी हजारो संकेतस्थळे इंटरनेटवर उपलब्ध आहेत, पण विस्तारभयास्तव या संकेतस्थळाच्या नोंदी करणे शक्य नाही. पण सांगावयाचा महत्त्वाचा मुद्‌दा असा की, या संकेतस्थळाचा वापर करून आपण अध्यापन अधिक प्रभावीपणे करू शकतो. .

एकूणच मराठीच्या अध्यापनात माहिती तंत्रज्ञानाचा वापर करणे ही आज काळाची गरज बनली आहे. काळ झपाट्याने बदलत आहे, ज्ञान झपाट्याने बदलत आहे, ज्ञान देण्याची प्रक्रियाही झपाट्याने बदलत आहे. माहिती-तंत्रज्ञानाच्या आणि जागतिकीकरणाच्या या काळामध्ये मराठीच्या अध्यापकांनी अद्‌ययावत राहणे गरजेचे आहे, त्यासाठी या सर्व साधनांचा वापर केल्यास आपले अध्यापन अधिक सुलभ आणि प्रभावी होईल व भाषेकडे बघण्याचा विद्‌यार्थ्यांचा दृष्टिकोन बदलू शकतो. भाषा जीवन जगण्याचे साधन आणि माध्यम बनण्यासाठी, तिच्यामध्ये अधिक गोडी निर्माण करण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर केल्यास या विषयाकडे विद्‌यार्थी अधिक मोठ्या प्रमाणात आकर्षित होतील आणि गुणवत्ता संपादन करतील. गुणवत्ता वाढीसाठी मराठीचे अध्ययन आणि अध्यापन करत असताना या माहिती तंत्रज्ञानाच्या साधनांचा व इतर उपलब्ध असलेल्या अनेक साधनांचा वापर केल्यास मराठीचे अध्यापन अधिक प्रभावी होईल, असे नम्रपणे नमूद करावेसे वाटते. .

**संदर्भ ग्रंथ :**

1. उत्तम अध्यापनाची रहस्ये - संपादक डॉ.अशोक केळकर
2. माहिती तंत्रज्ञान - उज्वला जितेंद्र अहिरराव
3. www.mr.wikipedia.org
4. www.mymarathi.com
5. www.marathimati.com
6. www.marathimandali.com
7. www.manase.org
8. www.khape.org
9. www.athwanitil-gani.com

वर्ष १० वे
अंक - ४ था (जानेवारी ते मार्च - २०२०)

UGC CARE Listed Journal
ISSN 2231 - 573X

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# लिहूण

भाग - १



संपादक
डॉ. शिवाजी हुसे
मराठी विभाग प्रमुख,
शिवाजी महाविद्यालय, कन्नड, जि. औरंगाबाद.

वर्ष - १० वे - अंक - चौथा - जानेवारी ते मार्च - २०२०
तिफण - ISSN 2231 - 573X

# अनुक्रमांक (भाग - 9)



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | मध्ययुगीन मराठी साहित्याचे अध्ययन-अध्यापन :एक दृष्टीक्षेप<br>**डॉ. राजाराम अं. झोडगे** | १-३ |
| २ | संत साहित्याचे अध्ययन,अध्यापन...आजच्या संदर्भात<br>**डॉ. रामा रोकडे** | ४-१० |
| ३ | संत साहित्याचे अध्यापन<br>**प्रा. रमेश बलभीम जाधवर** | ११-१४ |
| ४ | संत साहित्याचे अध्ययन आणि संशोधन<br>**प्रा. डॉ. दत्तात्रय प्र. डुंबरे** | १५-२१ |
| ५ | संत साहित्यांचे अध्यायन, अध्यापन आणि संशोधन<br>**प्रा. डॉ. बालासाहेब कोंडीबा जाधव** | २२-२५ |
| ६ | संत साहित्याचे अध्ययन, अध्यापन आणि संशोधन<br>**डॉ. मिलिंद नामदेवराव भिलपवार** | २६-२८ |
| ७ | संत साहित्याचे अध्ययन, अध्यापन आणि संशोधन<br>**प्रा. पसरकले समाधान** | २९-३२ |
| ८ | संत साहित्याचे अध्ययन, अध्यापन आणि संशोधन<br>**प्रा. डॉ. जगतवाड शिवाजी पिराजी** | ३३-३५ |
| ९ | संत साहित्याचे अध्ययन आणि अध्यापन<br>**डॉ. एम. ए. कव्हळे** | ३६-४० |
| १० | मध्ययुगीन संत वाङमयातील सौंदर्यविषयक दृष्टिकोन<br>**डॉ. सिद्धार्थ आगळे** | ४१-४४ |
| ११ | संत तुकारामांच्या अभंगांचे अध्ययन, अध्यापन आणि संशोधन<br>**डॉ. राखी सिद्राम सलगर** | ४५-४७ |
| १२ | प्राचीन मध्ययुगीन साहित्याचे अध्ययन व अध्यापन<br>**प्रा. डॉ. अनिल बळीराम बांगर** | ४८-५३ |

वर्ष - १० वे - अंक - चौथा - जानेवारी ते मार्च - २०२०
तिफण - ISSN 2231 - 573X

# ९. संत साहित्याचे अध्ययन आणि अध्यापन

**डॉ. एम. ए. कव्हळे**
मराठी विभाग, सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव जि. बीड.

संत साहित्याचे अध्ययन, अध्यापन आणि संशोधन ही आजच्या काळाची गरज बनली आहे. आज आपण २१ व्या शतकामध्ये वावरत आहोत. हा काळ जागतिकीकरणाचा आणि स्पर्धेचा काळ आहे. या काळात जग झपाट्याने बदलत आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान याने कमालीची प्रगती केली आहे. मानवी जीवन अधिक सुसह्य आणि आनंदी करण्याकडे या काळात मोठया प्रमाणात भर देण्यात येत आहे. असे असले तरी या काळाने या प्रगतीच्या नावाखाली सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, बौद्धिक, शारिरीक अधःपतन करून घेण्याकडेही वाटचाल सुरू केलेली दिसून येते. एकीकडे मानव भौतिकदृष्टया प्रगत झाला पण दुसरीकडे नैसर्गीकदृष्टया तो अधःपतनाकडे वळलेला दिसतो. अशा काळात संत साहित्याचे अध्ययन आणि अध्यापन करताना कमालीची कसरत करावी लागणार आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या काळातील मानवाच्या जगण्याच्या संकल्पना बदलल्या आहेत. देव, धर्म आणि भक्ती या संकल्पनेकडे पाहण्याची त्यांची दृष्टीही बदलली आहे. अशा काळात संत साहित्याचे अध्ययन आणि अध्यापन वेगळया अंगाने आणि काळसुसंगत करणे आवश्यक आहे.

संत साहित्याचे अध्ययन करताना सर्वात महत्त्वाचा विचार करणे गरजेचे आहे तो म्हणजे संत साहित्य निर्माण होण्यामागील प्रेरणा आणि कारणे कोणती होती. कोणतेही साहित्य हे त्या काळाचे अपत्य असते. संत साहित्यालाही हे विधान लागू पडते. वारकरी संप्रदायाची निर्मितीलाच काळ कारणीभूत आहे. त्यामुळे काळाच्या कसोटीवरच संत साहित्याचेही अध्ययन आणि अध्यापन होणे आवश्यक आहे. वारकरी संप्रदायाच्या उदयाचा काळ हा वैदिक संस्कृती आणि धर्माच्या अधःपतनाचा काळ होता. कर्मकांड आणि जाचक रूढी परंपरांनी सामान्यांचे जगणे मुस्कील करून टाकले होते. तेराव्या शतकातील धार्मिक व सामाजिक परिस्थितीबद्दल ल.रा.नसिराबादकर लिहितात, "सारी माणसे जादुटोणे, भूत-भविष्य, जारणमारण-तंत्र यात रस घेत होती. समाजात ज्योतिषविद्याप्रवीण, मोहणविद्याप्रवीण अशी माणसे खूप होती. शिल्पकला, पाककला, वैद्यकशास्त्र, संगीताभ्यास करणारी मंडळीही समाजात होती. पण त्यांच्याजवळ स्वतंत्र दृष्टी नव्हती. बौद्ध, जैन, महानुभाव संप्रदायस्वरूपात आत्मज्ञान सांगत होते. खरे म्हणजे, त्यांनी वैदिक धर्माविरूद्ध बंडच पुकारले होते. या मतमतांच्या भोवज्यात सर्वसामान्य माणूस भांबावलेला होता. अशा या समाजाला मार्ग दाखवून त्यांचा उद्धार करण्याची जबाबदारी ज्या शास्त्रीपंडितांवर होती, ते मात्र माणुसकीला पारखे झाले होते व आपल्या उदरनिर्वाहात मग्न होते."१ अशा काळात सर्वसामान्य माणसाला ज्ञानाचा आणि जगण्याचा नवा मार्ग दाखविण्यासाठी वारकरी संप्रदायाची निर्मिती झाली. त्यामुळे वारकरी संप्रदायाचे अध्ययन करण्यापुर्वी या संप्रदायाच्या निर्मितीमागील कारणमीमांसा व काळाचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.

वैदिक धर्माला आलेल्या ग्लानीमुळे आणि वाढलेल्या कर्मकांडामुळे गोंधळलेल्या सर्वसामान्य माणसाला भक्तीचा नवीन मार्ग दाखवण्यासाठी आणि धर्माचे काम आणि परमार्थविषयाचे ज्ञान समाजाच्या शेवटच्या थरापर्यंत नेऊन पोहोचविण्यासाठी वारकरी संप्रदायाची निर्मिती झाली. यासाठी त्यांनी तत्त्वज्ञानाच्या प्रचार आणि प्रसारासाठी सर्वसामान्याला अवगत असलेल्या देशी भाषेचा, मराठीचा वापर केला. समाजातील आठरापगड जातीसाठी भक्तीचा मार्ग खुला करून दिला. वारकरी संप्रदायाने वेदाला मान्यता दिली असली तरी परमार्थ, ज्ञान आणि भक्ती याचा अधिकार फक्त एका वर्गाची मक्तेदारी नसून याचा अधिकार सर्वसामान्याला असल्याचे प्रतिपादन केले आहे. वारकरी संप्रदायाचे अध्ययन करणाऱ्या अभ्यासकांनी या बाबीकडे आवर्जून लक्ष देणे आवश्यक आहे, पण अभ्यासक याकडे दुर्लक्ष करतात. याविषयी शंकरराव चव्हाण यांनी खंत व्यक्त केली आहे ते म्हणतात, "आर्य, धर्म, वैदिक परंपरा समाजरचना यांच्या प्राचीन कल्पना त्यांनी प्रमाण मानल्या आहेत. पण वेदान्त आणि परमेश्वराची भक्ती याचा अधिकार आणि तदनुसार आचार हा कुणाचाही एकट्याचा मक्ता नाही, ही गर्जना मात्र त्यांनी सर्वत्र उठवली आहे. दुदैव असे की, आधुनिक अभ्याता या गर्जनेकडे अभ्यासकांचे लक्ष जावे तितके जात नाही. असे झ ाल्यामुळे सातशे वर्षापूर्वी घडलेल्या क्रांतीचा यथार्थ बोध अजूनही झालेला नाही असे वाटते."२ 'कुळ जाति वर्ण। हे अवघेचि गा अकारण।ङ किंवा घ्या रे या रे लहान थोर। याती भलती नारी नर।ङ यासारख्या काव्यपंक्तीवरून वारकरी संप्रदायाने वर्णभेद आणि जातीव्यवस्था नाकारून लहान मोठयांना एका भागवत धर्माच्या झेंडयाखाली आणले व सर्वांसाठी भागवत धर्म खुला ही बाब लक्षात घेणे गरजेचे आहे.
करून दिल्याचे दिसते. वारकरी संप्रदायाचा अभ्यास करताना अभ्यासकांनी

समाजातील तळागाळातील सर्वसामान्यांपर्यंत ज्ञान आणि भक्तीचा प्रचार करण्यासाठी वारकरी संप्रदाय निर्माण झाला. यातूनच संतांच्या साहित्याची निर्मिती झाली. आजूबाजूला माजलेले स्तोम आणि अंधश्रद्धा यातून समाजाला बाहेर काढण्यासाठी संतांनी परमेश्वराचे स्वरूप स्पष्ट करून दाखविले. परमेश्वर हा चराचरात वसलेला असून त्याची भक्ती कोणत्याही जीवाला करता येते ही भूमिका संतांनी घेतली. पंढरीच्या पांडुरंगाला दैवत मानत हरी हर ऐक्याची भावना त्यांनी व्यक्त केली. परमेश्वराला भेटण्यासाठी कोणत्याही मंदिरात जाण्याची आवश्यकता नाही तर घरात राहून परमेश्वराची भक्ती करता येते व परमेश्वराची प्राप्ती होते हे विचार संतांनी मांडले. घ्वायु वसे सकळ ठायी। परी त्याचे बिज्हाडची नाही।ङ असे परमेश्वराचे स्वरूप असून त्याला भेटण्यासाठी 'न लागे सायास जाणे वनांतरा। सुखे येतो घरा नारायण...' असे सांगून सर्वसामान्यासाठी भक्तीमार्ग सोपा केला. घ्देव देव करिता शिनले माझे मन। पाणी आणि पाषाण जेथे तेथे...' अशा अनुभवातून दगडाच्या देवावर प्रहार केला. घ्दगडाचा तो देव बोलील तो कैसा। कवण मुखे वाचा फुटेल त्याशी...' किंवा घतिर्थी धोंडा पाणी। देव रोकडा सज्जनी।ङ अशा परखड शब्दातून धर्माने निर्माण केलेल्या देवाच्या संकल्पना नाकारण्याचे काम केले. देवाचे वास्तव रूप दाखविताना संतांनी माणसामध्ये, प्राणीमात्रामध्ये देव शोधला. 'संत येती घरा। तोचि दिवाळी दसरा...', 'देव घालावे परते। संत पुजावे आरते।ङ असा चांगल्या माणसात देव असल्याचे प्रतिपादन केले. नामदेव कुत्र्याच्या पाठीमागे तुपाची वाटी घेऊन पळाले तर नाथांनी ... गाढवाला काशीचे पाणी पाजले. या संतांच्या कृती उक्तीतून परमेश्वर भक्ती म्हणजे संसार न सोडता,

नियमित कर्म न सांडता देवाला मिळविता येते हा मार्ग सर्वसामान्यांसाठी खुला झाला. हा मार्ग सर्व संतांनी आपल्या अनुभवातून आणि अनुकरणातून सिद्ध करून दाखविला. वारकरी संप्रदायाचे अध्ययन करताना ही बाब लक्षात घेतली पाहिजे.

परमेश्वर आणि भक्त यांच्यातली दरी वारकरी संप्रदायाने नष्ट केली. परमेश्वराला जेवढे महत्त्व तेवढेच त्याच्या भक्तालाही असते नव्हे परमेश्वराचे भवितव्यच त्याच्या भक्तावर अवलंबून असते, हे वारकरी संप्रदायाचे तत्त्व आहे. अद्वैत तत्त्वज्ञान मांडून वारकरी संप्रदायाने देव आणि भक्त एकच असल्याचे सांगीतले. तुकाराम महाराजांच्या भाषेत सांगायचे झाल्यास 'देव पहावयासी गेलो आणि देवच होऊन ठेलो' असेल किंवा नामदेवाच्या भाषेत 'नामा म्हणे पुरूषोत्तमा। स्वयें जड़ले तुझ्या प्रेमा।। मी कुडी तूं आत्मा। स्वयें दोन्ही......' यावरून वारकरी संप्रदायाने माणसातील देव दाखविला. 'जे जे भेटे भूत। तया मानिजे भगवंत...' हे तत्त्वज्ञान सर्वसामान्यांना सांगीतले. जनाबाई आणि विठ्ठल यांच्यातील नातेही असेच सुमधुर आहे. प्रत्येक संताला विठ्ठल आपला सखा, सोबती वाटतो आणि प्रत्येक संताबरोबर विठ्ठल जगतो हे नाते वारकरी संप्रदायाने उच्चतम पातळीवर नेले. त्यामुळे देव आणि भक्त यांच्यात काम करणारी शोषणाची यंत्रणा नष्ट होण्यास मदत झाली. संत साहित्याचे अध्ययन आणि अध्यापन करताना ही संतांची भूमिका स्वीकारणे अगत्याचे ठरते. संतांनी महाराष्ट्रात आध्यात्मिक लोकशाही निर्माण केली असे सांगून या संतमेळयाबद्दल ल.रा.पांगारकर म्हणतात, "ह्या वैष्णवांत पुरूष आहेत, स्त्रिया आहेत, ब्राह्मणेत्तर आहेत व अस्पृश्यही आहेत. ज्ञानी आहेत व केवळभक्तीने मान्य झालेले साधेभोळेही आहेत, पण सर्वजण जातिकुलादिकांच्या अभिमानापलीकडे गेलेले आहेत. परमात्मसुखापुढे व परस्परप्रेमापुढे त्यांना इतर कसलीही आठवण नसे. हे सारे संत संसारी होते व हरीला सर्वस्व वाहिल्याने त्यांनी संसारच ब्रह्मरूप करून टाकला होता."३

संत साहित्याचे अध्ययन आणि अध्यापन करताना आणखी एक बाब लक्षात घेतली पाहिजे ती म्हणजे संतांनी आपल्या साहित्यातून मानवी विकारावर प्रहार केलेला दिसतो. धर्म आणि अध्यात्मामध्ये सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे मानवाचे आचरण होय. मानव नीतीमान आणि सद्वर्तनी असला की, त्याचे व इतराचे जगणे सुखाचे होते. सर्वच संतांनी मानवी मनातील षड्रिपू यांच्यावर हल्ला चढविलेला दिसतो. काम, क्रोध, मद, मत्सर, असूया, माया या मानवातील विकारामुळेच मानव अंधश्रद्धेला बळी पडतो, सत्य आणि असत्यातील भेद त्याला कळत नाही, मानव विवेकी बनत नाही, जगातील सत्ये त्याला कळत नाही आणि कोणतीही व्यक्ती त्याची फसवणूक करू शकते. या विकारामुळे मानवाने दुःखे ओढावून घेतली, नको त्याची लालसा केली, राजाचे रंक झाले. संत ज्ञानेश्वराने आपल्या पसायदानमधून 'दुरितांचे तिमीर जावो' हे मागणे मागीतले आहे. संत नामदेव 'अरे मना मर्कटा। पापिया चांडाळा लंपटा। परद्वार हिंडसी सुनाटा। अरे पापी चांडाळा......' अशा शब्दातून अशाच मनातील विकारावर प्रहार करतात. संत एकनाथांनी आपल्या भारूड आणि गवळणीच्या माध्यमातून मानवी मनातील सर्व विकारावर हल्ला केला आहे. तर संत तुकारामांनी 'कामक्रोध आड पडले पर्वत। राहिला अनंत पलीकडे। नुल्लंघवे मज न सापडे वाट दुस्तर हा घाट वैरियांचा' असा कामक्रोधादी विकारांचा समाचार घेतला आहे. संतमेळयातील बहुतांश संतानी आपल्या

साहित्यातून मानवी विकारावर परखड मत व्यक्त करत या विकारांचा नाश झाला पाहिजे ही भूमिका घेतलेली आहे. या मानवी मनातील विकारावर मात करूनच देवपदापर्यंत पोहोचता येते असा संतांना विश्वास आहे.

संत साहित्याचे अध्ययन आणि अध्यापन करताना लक्षात घ्यावयाची सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे संतांनी आपल्या साहित्यातून अनिष्ट रूढी, परंपरा यांच्यावर केलेला प्रहार, व्रतवैकल्ये, बळीसारख्या अनिष्ट प्रथांवर केलेले भाष्य, वारकऱ्यांसाठी सांगीतलेला नामस्मरणाचा सोपा मार्ग आणि उत्तम समाज उभा करण्यासाठी केलेले प्रयत्न या बाबी महत्त्वपूर्ण आहेत. संत साहित्यातून संतांनी आत्मशुद्धी, भूतदया, नाममहात्म्य, सर्वाठायी समभाव, कर्तव्यनिष्ठा व जीवननिष्ठा ही मूलभूत तत्त्वे सांगीतली. घ्दया तिचे नाव भूताचे पालन। आणिक निर्दालन कंठकांचे।ङ हा दयेचा नवा अर्थ दिला, सर्व प्राणीमात्रावर दया केली पाहिजे, 'दया क्षमा शांती। तेथे देवाची वस्ती...' हे तत्त्व प्रतिपादीत केले, बळी देणे पाप असून प्राणीमात्रावर प्रेम करण्याचा संदेश दिला, 'यज्ञयाग विधी। येणे नव्हे सिद्धी। बायाची उपाधी। दंभधर्म......' असे म्हणून यज्ञ, विधी, व्रतवैकल्ये यांचा निषेध केला, कर्मकांडांना मूठमाती देत सर्वांसाठी सहज सोपा भक्तीमार्ग सांगीतला, भौतिक सुखाच्या मागे न धावता घ्मरावे परि किर्ती रूपे उरावेङ हे जीवनज्ञान सांगीतले, सर्व विकारांवर मात करून आपणच भगवंत होण्याचा सल्ला दिला, भक्तीमार्गापासून कोसो दूर असलेल्या सर्वसामान्य माणसाला भक्तीच्या प्रवाहात आणून सोडले, धार्मिक आणि सांस्कृतिक अधःपतनाकडे चाललेल्या समाजाला नवी दिशा देऊन माणुसकीचे दर्शन घडविणारा नवा मार्ग दाखविला. या सर्वांच्या परिपाकातून गेल्या सातशे वर्षात महाराष्ट्रात वैचारिक क्रांती करण्याचे कार्य संतांनी व संत साहित्याने केलेले दिसते. संतांच्या या कार्याबद्दल बोलताना अ.ना.देशपांडे म्हणतात, च्सामान्यांना, कोणत्याही प्रकारची सामाजिक, आर्थिक, राजकीय वा धार्मिक प्रतिष्ठा नसलेल्यांना एक दार मात्र उघडे होते. भक्तीचे हे दार सगळयांना, शुद्रांना, अतिशुद्रांना, पतितांना, स्त्रियांना, भ्रष्टांना नेहमी मोकळे आहे, असे संतांनी सांगीतले. हे भक्तीचे दार उघडून, संतांनी सामान्यातल्या सामान्यांची, उपेक्षितातल्या उपेक्षितांची, पतितातल्या पतितांची, सगळयाच अगतिकांची, सामाजिक आणि मानसिक गरज भागविण्याचे केवढे थोर आणि उदात्त कार्य केले आहे.''४ या सर्व बाबींचा विचार केल्याशिवाय संत साहित्याचे अध्ययन पूर्ण होऊ शकत नाही व संत साहित्याच्या अध्यापनालाही दिशा मिळू शकत नाही.

आजच्या जागतिकीकरणाच्या काळामध्ये मानव कमालीच्या स्वार्थी बनत चालला आहे. आत्मकेंद्री वृत्ती वृद्धींगत होत असून मानवाचे सामाजिक व सांस्कृतिक अधःपतन होताना दिसत आहे. यंत्रयुगाच्या आगमनाने मानवातील क्रयशक्ती संपूष्टात येत असून माणूस यंत्राचा गुलाम बनत आहे. कुटुंबव्यवस्था मोडकळीस येत असून पैसा हाच सर्वस्व मानला जात आहे. भौतिक प्रगतीलाच सर्वस्व माणणारी मानसिकता निर्माण झालेली आहे. समाजाचे सांस्कृतिक अधःपतन होत असून नीतीमूल्यांचा ऱ्हास होताना दिसतो आहे. धर्म आणि देवाच्या नावाखाली शोषणाची नवी केंद्रे तयार झाली आहेत. घ्जेथे किर्तन करावे। तेथे अन्न न सेवावे।ङ असे सांगणाऱ्या संत तुकोबारायाच्या महाराष्ट्रात पैसा हा किर्तनाचा अंगभूत घटक बनला आहे. नाती तुटत चालली आहेत, नात्याला काळीमा फासणाऱ्या गोष्टी समाजात घडत आहेत. तेराव्या शतकामध्ये ज्या अधःपतनाला नष्ट करण्यासाठी

वारकरी संप्रदाय निर्माण झाला, तिच परिस्थिती आज निर्माण झालेली आपणास पहावयास मिळत आहे. या सर्व बाबींचा विचार करता आज पुन्हा संतांच्या विचाराची समाजाला गरज आहे. संतांच्या विचारामध्ये नवसमाजनिर्मितीची शक्ती आहे. यासाठी संत साहित्याचे अध्ययन आणि अध्यापन अतिशय वस्तुनिष्ठ पद्धतीने होणे आवश्यक आहे. संत साहित्याच्या अध्ययनाने जगण्याची नवी दिशा मिळू शकते, भरकटलेल्या समाजाला नवी उमेद मिळू शकते, मानवी जीवनाच्या कल्याणासाठी आज संत साहित्याचे अध्ययन करणे अनिवार्य होणे गरजेचे आहे, असे नम्रपणे नमूद करावे वाटते.

## संदर्भ

१. ल.रा.नसिराबादकर, प्राचीन मराठी वाङमयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, सातवी आवृत्ती २००३, पृ.४३

२. शंकरराव खरात, संतांची सामाजिक दृष्टी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २००५, पृ.१०

३. ल.रा.पांगारकर, मराठी वाङमयाचा इतिहास, भाग पहिला, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी, पुणे, आवृत्ती दुसरी १९७२, पृ.४२३

४. अ.ना.देशपांडे, प्राचीन मराठी वाङमयाचा इतिहास, भाग पहिला, उत्तरार्ध, व्हीजन प्रकाशन, पुणे, १९६९ पृ.१६७